



दैनिक

# युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता


Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25






वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ८3 । किंमत - ४ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) । रविवार । ०५/०४/२०२६ । पान - ६


# कार विहिरीत कोसळली

## एकाच कुटुंबातील नऊ जणांचा मृत्यू



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यात एक हृदयद्रावक दुर्घटना घडली असून संपूर्ण परिसर शोकसागरात बुडाला आहे. भरधाव वेगाने धावणारी कार थेट विहिरीत कोसळल्याने एकाच कुटुंबातील तब्बल ९ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या भीषण अपघाताने नाशिक जिल्हा हादरून गेला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एमएच१५-जेएस-१०५३ क्रमांकाची टोयोटा एर्टिगा कार दिंडोरी शहरातील शिवाजीनगर परिसरात असलेल्या विहिरीत कोसळली. ही विहीर स्थानिक नागरिक राजू राजे यांच्या मालकीची असल्याची माहिती समोर आली आहे. अपघात इतका भीषण होता की कारमधील सर्व ९ जणांचा जागीच मृत्यू झाला.

ही सर्व मंडळी इंदोरे गाव येथील रहिवासी असून ते एका स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम आटोपून आनंदात घरी परतत होते. मात्र नियतीने घात केला आणि काही क्षणातच आनंदावर विरजण पडलं. कार अनियंत्रित होऊन रस्त्यालगतच्या विहिरीत कोसळल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या अपघातातील सर्वात वेदनादायक बाब म्हणजे मृतांमध्ये ३ ते ४ लहान मुलांचाही समावेश असल्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यामुळे संपूर्ण गावावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. प्रशासनालाही तत्काळ पाचारण करण्यात आले. रात्री उशिरापर्यंत बचावकार्य सुरू होते. अखेर क्रेनच्या सहाय्याने कार विहिरीतून बाहेर काढण्यात आली, मात्र त्यामधील सर्व प्रवासी मृत अवस्थेत आढळून आले.

आतापर्यंत समोर आलेल्या मृतांची नावे पुढीलप्रमाणे - सुनील दत्तू दरगोडे, राखी सुनील दरगोडे, उषा अनिल दरगोडे, श्रद्धा अनिल दरगोडे, श्रावणी अनिल दरगोडे, उर्वरित मृतांची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे.

या भीषण दुर्घटनेमुळे संपूर्ण दिंडोरी तालुका शोकाकुल झाला असून, एकाच कुटुंबातील ९ जणांचा अंत झाल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# राज्यात अवकाळीचे धुमशान सुरूच

## अस्मानी संकटाने बळीराजाचा तोंडचा घास हिरावला

अहिल्यानगर (प्रतिनिधी)

संगमनेर - राज्यभरात ऐन उन्हाळ्यात सध्या कोसळत असलेल्या अवकाळी पाऊस, गारपीटसह सोसाट्याच्या वाऱ्यानं बळीराज्याचं अतोनात नुकसान केलं आहे. तर अनेक ठिकाणी काढणीला आलेल्या पिकांसह फळबागांना मोठा फटका बसला आहे. एकीकडे आखातातील युद्धमुळे महागाईची झळ सोसत असताना अस्मानी संकट उभं राहिले आहे. अशातच आज (४ एप्रिल) देखील महाराष्ट्रात अवकाळी पावसाचा जोर कायम आहे. आज पुन्हा १६ जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. प्रादेशिक हवामान विभागाने वर्तविलेल्या अंदाजानुसार, ४ एप्रिलला महाराष्ट्रात बहुतांश जिल्ह्यात अवकाळी पाऊस, मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि ताशी ३०-५० किमी वेगाने वादळी वारे येण्याची शक्यता आहे. काही भागांत गारपिटीचा इशारा देण्यात आला आहे. तर विदर्भ, मराठवाड्यासह मध्य महाराष्ट्रातील १६ जिल्ह्यांना यलो अलर्ट असेल.

भंडाऱ्यात रात्रीच्या सुमारास अनेक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसानं हजेरी लावली. काही भागात जोरदार तर, काही ठिकाणी मध्यम स्वरूपाच्या पाऊस बरसला. मागील दोन दिवसात पडलेल्या पावसानं जिल्ह्यातील मका, भाजीपाला आणि आंबा उत्पादक शेतकरी चांगलेच अडचणीत आले आहे. रात्रीच्या पावसानं शेतकऱ्यांची चिंता पुन्हा वाढली आहे. अवकाळी पावसात रात्रीच्या सुमारास अनेक भागातील काहीकाळ वीज पुरवठा खंडीत झाला होता. दरम्यान, नंदूरबार जिल्ह्यात दोन दिवसात झालेला अवकाळी पाऊस आणि गारपिटीने मोठं नुकसान झाल्याचे चित्र आहे.



यात जिल्ह्यातील ६२ गावांतील ९५४ शेतकरी बाधित झाले असून ८३२ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झालं आहे. अवकाळी पावसाच्या सर्वाधिक फटका कांदा, मका, ज्वारी, बाजरी, गहू, केळी पपई आणि आंबा बागांना बसला आहे. दरम्यान, या नुकसानीचे पंचनामे करून तात्काळ अहवाल शासनाकडे पाठवला जाणार असल्याची माहिती आहे. कृषी विभाग आणि जिल्हा प्रशासनाने या संदर्भात माहिती दिली आहे. तर शासनाने तातडीने नुकसान भरपाई देऊन शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.

प्रादेशिक हवामान विभागाने वर्तविलेल्या अंदाजानुसार विदर्भ, मराठवाड्यासह मध्य महाराष्ट्रातील १६ जिल्ह्यांना यलो अलर्ट असेल. उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, जळगाव, नंदुरबार, धुळे आणि अहिल्यानगर जिल्ह्यात आज पुन्हा वादळी पाऊस होईल. इतर जिल्ह्यांत तुरळक पावसाची शक्यता असून काही ठिकाणी गारपीट होईल. (पान २ वर)

# आ. खताळांकडून काकडवाडीत पिण्याच्या पाण्यासाठी टँकर सुरू



**युवावार्ता (प्रतिनिधी)**

**संगमनेर** - तालुक्यातील काकडवाडी गावात निर्माण झालेल्या तीव्र पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर आ. अमोल खताळ यांच्या माध्यमातून दररोज पिण्याच्या पाण्याचा टँकर सुरू करण्यात आला आहे. या निर्णयामुळे गावातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून त्यांच्या पाण्याच्या समस्येवर तात्पुरता का होईना पण प्रभावी तोडगा निघाला आहे.

उन्हाळयाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असल्याने काकडवाडी गावात पाणीटंचाईची झळ नागरिकांना बसू लागली होती. विहिरी आणि बोअरवेलचे पाणी कमी झाले असल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला होता. ही परिस्थिती लक्षात घेऊन गावातील पत्रकार दत्तात्रय घोलप, योगेश मुळे, अर्जुन शिरसाठ, गोकुळ गायकवाड, शरद महाराज ढवळे, भाऊसाहेब काळे, सतीश मुळे, गणेश काळे यांच्यासह महायुतीच्या कार्यकर्त्यांनी आ.अमोल खताळ यांच्याकडे तातडीने पाण्याचा टँकर सुरू करण्याची मागणी केली होती.

युवा कार्यकर्त्यांची मागणी गांभीर्याने घेत आ. खताळ यांनी जनसेवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून तत्काळ निर्णय घेत काकडवाडी गावासाठी दररोज पिण्याच्या पाण्याचा टँकर सुरू केला. जोपर्यंत पावसाचे आगमन होत नाही, तोपर्यंत हा टँकर नियमितपणे सुरू राहणार असल्याची माहिती शिवसेना महायुतीचे युवा कार्यकर्ते योगेश मुळे यांनी दिली.

टँकर सुरू झाला असल्यामुळे पिण्याच्या पाण्याची मोठी सोय झाली असून महिलांची व नागरिकांची पाण्यासाठी होणारी दैनंदिन धावपळ कमी झाली आहे. आमदार अमोल खताळ यांनी वेळेत घेतलेल्या या निर्णयाबद्दल काकडवाडी ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले असून या मदती मुळे गावाला दिलासा मिळाल्याची भावना व्यक्त केली आहे.

# समनापूर येथे देशी दारू दुकानात तोडफोड

## १२ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- तालुक्यातील समनापूर येथे सरकारमान्य देशी दारूच्या दुकानात घुसून शिवीगाळ, तोडफोड व धमकी दिल्याप्रकरणी १२ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि. २ एप्रिल २०२६ रोजी सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास घडली. याबाबत फिर्यादी दिनेश मुरलीधर मिलाने (रा. मालदाड रोड, संगमनेर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ते समनापूर येथे सरकारमान्य देशी दारूचे दुकान चालवितात. घटनेच्या दिवशी देवा शेरमाळे व वंदना शेरमाळे हे दुकानात येऊन तेथील कामगार संतोष गवळी यास दारूचा व्यवसाय करू नये असे सांगत शिवीगाळ करू लागले.

याबाबत माहिती मिळताच मिलाने हे दुकानावर पोहोचले असता, तेथे देवा शेरमाळे, वंदना शेरमाळे, रियाज सिराज शेख, त्यांची पत्नी व आई (नाव माहीत नाही), राजू आबू शेख, माम्या शेरमाळे, बंडू इनामदार, संतोष शेरमाळे, प्रविण गायकवाड, संदीप दळवी व योगेश नवनाथ आव्हाड (सर्व रा. समनापूर) यांनी एकत्र येऊन दुकानातील दारूच्या बॉक्स व ग्लासांची तोडफोड केली. तसेच सीसीटीव्ही व डीव्हीआर उपकरणांचेही नुकसान केले. यावेळी आरोपींनी फिर्यादीस शिवीगाळ करत पुढे दुकान चालवू नये, अन्यथा परिणाम भोगावे लागतील अशी धमकी दिली. तसेच दुकानाचे शटर बंद करून कुलूप लावून तेथून निघून गेले. या प्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर २६५/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १८९(२), १९१(२), १९०, ३२४(४), ३५२, ३५१(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

# बुवाबाजीविरोधात कठोर कायद्यासाठी प्रयत्न - बनसोडे

## अंनिस'च्या राज्य परिषदेतून कार्यकर्त्यांचा निर्धार




युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - गेल्या ३६ वर्षांपासून अंधश्रद्धा निर्मूलन समिती बुवाबाजी विरोधात लढा देत आहे पण भोंदू अशोक खरातसारख्या प्रकरणामुळे समाजात जनमत तयार होते. अंधश्रद्धेच्या नावाखाली महिलांवर अत्याचार करणारी खरात एक प्रवृत्ती असून, समाजातून अशा वृत्तींचा समूळ नायनाट करण्यासाठी देशपातळीवर बुवाबाजी विरोधातील कायदा कडक आणि कठोर करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सडेतोड् मत 'अंनिस'चे राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे यांनी मांडले.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती आयोजित फलज्योतिष आणि बुवाबाजीविरोधी संघर्ष राज्य परिषदेच्या उद्घाटन सत्रात भूमिका मांडताना ते आज बोलत होते. ३० जिल्ह्यांतून तीनशेहून अधिक प्रतिनिधींनी परिषदेला उपस्थिती नोंदविली. एप्रिल महिन्यात महात्मा जोतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी होत असताना राज्यात पुरोगामित्वाचा वारसा हरवला का, अशी शंका आता येत असल्याचे सांगत बनसोडे यांनी खरातला पाठीशी घालणारे व विविध माध्यमातून मदत करणाऱ्यांना न्यायालयीन कक्षेत आणले पाहिजे असे सांगितले.

या परिषदेमध्ये जादूटोणाविरोधी कायदा प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, या कायद्याची व्याप्ती वाढवावी, हा कायदा देश पातळीवर लागू करावा तसेच सर्व नेते व शासकीय पदाधिकारी यांना कायद्याअंतर्गत आचारसंहिता लागू करावी. भोंदूगिरी व बुवाबाजी या विरोधात नवीन पिढीच्या शैक्षणिक अभ्यासक्रमात हा विषय समाविष्ट करावा असे ठराव मंजूर करण्यात आले.












# बनावट कागदपत्रांद्वारे शेतीची विक्री

## सहा नातेवाईकांविरोधात गुन्हा



**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–** वारस असताना नातेवाईकांनी बनावट कागदपत्र तयार करून चिंचोली गुरव येथील शेतीचे परस्पर वाटप केले. तर दैवकोठे येथील शेतीचेही बनावट कागद पत्राच्या आधारे दुसऱ्या व्यक्तीच्या नावावर अर्धी शेती केली. यातील काही शेती परस्पर विकुन फसवणूक केल्याप्रकरणी तालुका पोलिसात सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तालुका पोलिसांनी गुन्हा दाखल करून न घेतल्याने, फसवणूक केल्या प्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी अशोक सोनवणे यांनी न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाच्या आदेशानुसार, फिर्यादी अशोक बाबुराव सोनवणे यांचे तक्रारीवरून गणपत जगन्नाथ सोनवणे (श्रीरामपूर), विश्वनाथ दादा सोनवणे (पळसखेडे), शिवाजी राधु सोनवणे (घुलेवाडी), बाबुराव ऊर्फ बाबु दादा सोनवणे (राहाता), दत्तात्रय मुक्ताजी सोनवणे (राहाता), सुनिता विलास मुंगसे (देवकौठे) याचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या बाबत तालुका पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अशोक सोनवणे यांचे शेत गट नं ४९५ (१) मधील एकुण क्षेत्र १ हेक्टर ३५ आर मधील ही शेती नातेवाईकांनी, अशोक सोनवणे हे वारसदार असतांना सुद्धा तिसऱ्या व्यक्तीला कागदपत्राचे बनावटीकरण करुन, तसेच खोटे कागदपत्र खरे आहेत असे सांगून वाटप केले. तसेच देवकौठे येथील शेत गट नं १४४ (१) मधील एकुण ७ हेक्टर ६९ आर पैकी, अशोक सोनवणे हे शेतीस वारसदार असताना कागदपत्राचे बनावटीकरण, खोटे कागदपत्र खरे आहेत हे समजावुन एकुण शेतीच्या क्षेत्रापैकी निम्मे भागुजी महादु सोनवणे यांचे वारसाचे नावावर केले व निम्मे नातेवाईकांनी नावावर करुन घेतले.

सन २०२४ मध्ये नातेवाईकांनी १४० (१) मधील मिळालेला निम्मा हिस्सा पैकी २ हेक्टर शेतजमिन स्वतः चे नावावर करुन घेतली आहे. त्यानंतर वाट्याला आलेले क्षेत्र त्यांनी सुनिता विलास मुंगसे यांना विकली आहे. नातेवाईकांनी फसवणूक केल्याप्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी अशोक सोनवणे यांनी न्यायालयात धाव घेतली. प्रथम न्यायदंडाधिकारी यांनी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिल्याने, तालुका पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास उपनिरीक्षक सातपुते करत आहेत.

## राज्यात अवकाळीचे घुमशान...पान १ वरुन

मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यांवर आज देखील अवकाळीचे काळे ढग घोंघावत आहे. छत्रपती संभाजीनगरसह जालना, परभणी, हिंगोली, लातूर, नांदेड, बीड आणि धाराशिवमध्ये ताशी ३०-५० किमी वेगाने वारे वाहतील. पुढील ४८ तास हवामानाची हीच स्थिती राहण्याची शक्यता आहे. विदर्भात देखील अवकाळी संकट कायम आहे. तसेच मेघगर्जना, विजा आणि वादळी वार्यांसह पाऊस होईल. अमराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यांवर आज देखील अवकाळीचे काळे ढग घोंघावत आहे.

# भास्करराव सिनारे यांचे निधन



**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–** चिखली गावचे ज्येष्ठ व अभ्यासू राजकीय व्यक्तिमत्त्व, लोकनेते बाळासाहेब थोरात यांचे एकनिष्ठ सहकारी, भास्करराव मारुती सिनारे पाटील (वय- ६६) यांचे नुकतेच निधन झाले.

भास्कररावांच्या रूपाने चिखली गावाने एक अभ्यासू, विकासाभिमुख आणि जनतेशी नाळ जोडलेले नेतृत्व गमावले आहे. राजहंस दूध संघाचे डायरेक्टर, काँग्रेस पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते तसेच लोकनेते बाळासाहेब थोरात साहेबांचे विश्वासू सहकारी म्हणून त्यांनी दीर्घकाळ काम केले. चिखली गावचे सरपंच म्हणूनही त्यांनी काम पाहिले आणि अनेक वर्षे ग्रामपंचायतीवर प्रभावी नेतृत्व त्यांनी केले.

छत्रपती दूध संस्थेवरही त्यांची अनेक वर्षे सत्ता राहिली. गावच्या राजकारणात अनेकदा विरोध झाला, अनेकांनी साथ दिली, अनेकांनी मतभेदही मांडले, पण भास्कररावांनी नेहमीच सर्व गोष्टी समजून घेत विकासकामांना प्राधान्य दिले. लोकांशी जिव्हाळ्याने वागणारे, शांतपणे पण ठामपणे निर्णय घेणारे आणि अभ्यासू दृष्टिकोन ठेवणारे असे व्यक्तिमत्त्व आज आपल्यात नाही, ही गावासाठी मोठी हानी आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली असा परिवार आहे.

दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने भास्करराव सिनारे पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# आश्वी परिसरात अवकाळीने शेतकरी हवालदिल



चनेगाव परिसरात झालेल्या अवकाळी पावसाने काढणीला आलेला उभा गहू आडवा झाला

**आश्वी (युवावार्ता प्रतिनिधी)–** संगमनेर तालुक्याच्या आश्वी पंचक्रोशीतील गावांना शुक्रवारी (दि. ३) अवकाळी पावसाने झोडपून काढले. सायंकाळी जोरदार वादळी वारा आणि विजांच्या कडकडाटासह झालेल्या या पावसामुळे उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

शुक्रवारी सकाळी कडक उन्हानंतर दुपारी प्रचंड उकाडा व आर्द्रता जाणवत होती. सायंकाळी पाचच्या सुमारास अचानक वादळी वाऱ्यासह पावसाने जोरदार हजेरी लावली. तब्बल दीड ते दोन तास जोरदार पाऊस झाला. सध्या परिसरात गहू काढणीचा हंगाम सुरू आहे. मात्र पावसामुळे सोंगणी अभावी उभा असलेला गहू पूर्णपणे भिजला असून अनेक ठिकाणी पीक जमिनीवर आडवे पडले. काढणीला आलेला व साठवलेला कांदा पावसात भिजल्याने कुजण्याची भीती निर्माण झाली आहे. तसेच आंबा व द्राक्षांची फळगळ झाली असून डाळिंब व टरबूज बागांचेही नुकसान झाले आहे.

दरम्यान, या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवण्याची शक्यता निर्माण झाली असून, नुकसानीचे पंचनामे करून शासनाने तातडीने मदत द्यावी, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून होत

# ११० दिव्यांगांना साडेपाच लाखांचा निर्वाह भत्ता वाटप

**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–** तालुक्यातील गुंजाळवाडी ग्रामपंचायतीच्या हद्दीतील ११० दिव्यांगांना ग्रामपंचायतीच्या ५ टक्के दिव्यांग कल्याण निधीतून निर्वाह भत्ता प्रति लाभार्थी पाच हजार रुपये, याप्रमाणे ५ लाख ५० हजार रुपये बँक खात्यांवर वर्ग करण्यात आली, अशी माहिती सरपंच नरेंद्र गुंजाळ यांनी दिली.

दिव्यांग प्रतिनिधी सुशीला पवार यांचा प्रातिनिधिक स्वरूपात सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रामसेवक भरत आहेर, उपसरपंच भाऊसाहेब गुंजाळ, सदस्य पंडित गुंजाळ, उज्वला गुंजाळ, पद्मा बर्डे, सविता गुंजाळ, आरती गुंजाळ, विलास निधुते, सुनीता गुंजाळ, अशोक गुंजाळ, पोपट अरगडे, नयना रहाणे, लक्ष्मी तुपसुंदर, अमोल गुंजाळ, अतुल अभंग, ललिता शिंदे, मच्छिंद्र रहाणे, संगीता अरगडे यांसह ग्रामपंचायत कर्मचारी, ग्रामस्थ उपस्थित होते.























दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
• मेडिसिन • सर्जरी
• स्त्रीरोग – प्रसुति
• मुळव्याध–भगंदर–फिशर
• लेझर सेंटर
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line :
7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



# अकोले तालुक्याला अवकाळीचा फटका

## आ. लहामटे मदतीसाठी पाठपुरावा करणार



अकोले :

(युवावार्ता प्रतिनिधी)–

सोमवारी सायंकाळी तालुक्यात सर्वदूर अवकाळी पाऊस आणि गारपीट होऊन, १७ गावांमधील जवळपास ४ हजार ५०० हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज तालुका कृषी, महसूल, ग्रामपंचायत विभागाकडून दिला गेला असून, मंगळवारी आमदार डॉ. किरण लहामटे व प्रशासन अधिकारी यांनी समशेरपूर, सावरगावपाट, देवठाण भागात नुकसान पाहणी दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी शेतकऱ्यांची बाजू समजून घेत दिलासा दिला.

अवकाळी पाऊस, गारपिटीने तालुक्यातील आढळा खोऱ्यातील व अन्य भागातील शेतीपिकांचे नुकसान केले. पीक नुकसानाचे पंचनामे तातडीने करावेत, अशा सूचना कृषी व महसूल प्रशासनाला देण्यात आल्या. सरकारकडून तातडीने मदत मिळावी, यासाठी कृषिमंत्री यांची भेट घेऊन पाठपुरावा करणार असल्याचे आमदार लहामटे यांनी बाधित शेतकऱ्यांना आश्वासित केले.

यावेळी तालुका कृषी अधिकारी अतुल पवार, मंडळ कृषी अधिकारी बिन्नर, जोरवेकर, तसेच संबंधित विभागातील महसूल मंडळ अधिकारी बाबासाहेब दातखिळे, तलाठी अमोल गडाख, विशाल चावडे, कृषी सहायक रूपाली बांगरे, ग्रामसेवक संजय वाघ, सुधीर शेळके, शिवाजी पाटोळे, अनिल सोनवणे उपस्थित होते.

# बारागाव पिंप्री आरोग्य केंद्राची दयनीय अवस्था









बारागाव पिंप्री (युवावार्ता प्रतिनिधी)–

येथील शासकीय आरोग्य केंद्रामध्ये गरोदर महिलांची तपासणी, लहान मुलांचे लसीकरण, तसेच विविध किरकोळ आजारांवर उपचारासाठी दररोज मोठ्या प्रमाणात नागरिकांची ये-जा असते. विशेषतः महिला वर्ग लहान मुलांना लसीकरणासाठी या केंद्रात घेऊन येत असतो. मात्र, सध्या या आरोग्य केंद्राची अत्यंत जीर्ण अवस्था झाल्याने नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे.

सदर आरोग्य केंद्राची इमारत खूप जुनी असून, तिच्या दुरुस्ती व नव्या इमारतीसाठी मंजुरी मिळाल्याची माहिती आहे. तरीही प्रत्यक्ष कामास सुरुवात झालेली नाही. दरम्यान, इमारतीचे काही भाग ढासळले असून, काही ठिकाणी पडझडीची शक्यता निर्माण झाली आहे. अशा धोकादायक परिस्थितीतही कर्मचारी लहान मुलांना व महिलांना तपासणीसाठी याच ठिकाणी बोलवत असल्याने संताप व्यक्त होत आहे.

याशिवाय, आरोग्य केंद्रासमोर असलेल्या पाण्याच्या टाक्यांमध्ये सडलेले पाणी, कचरा साचलेला असून, परिसरात मोठ्या प्रमाणात घाण व दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे डास व विविध जीवजंतूंचा प्रादुर्भाव वाढून परिसर पूर्णपणे दूषित झाला आहे. आरोग्य सेवेसाठी असलेल्या या ठिकाणीच अस्वच्छतेचे साम्राज्य असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या गंभीर परिस्थितीकडे संबंधित अधिकारी व प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. भविष्यात एखादी दुर्घटना घडून जीवितहानी झाल्यास जबाबदार कोण, असा सवालही नागरिक उपस्थित करत आहेत.

तरी संबंधित विभागाने तातडीने याकडे लक्ष देऊन पर्यायी व्यवस्था करावी, तसेच नवीन इमारतीचे काम लवकरात लवकर सुरू करावे, अन्यथा वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्यात येईल, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रय गोसावी यांनी दिला आहे.

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयाकडून कॅम्पस मुलाखतीचे यशस्वी आयोजन



संगमनेर (प्रतिनिधी) -

शिक्षक प्रसारक संस्थेच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या वतीने नुकतीच नोकरी कॅम्पस मुलाखतीचे नुकतेच आयोजन करून, प्रत्यक्ष मुलाखतीच्या माध्यमातून बी.एड्. प्रशिक्षणार्थींना शिक्षक पदावर कार्य करण्याची संधी उपलब्ध करून दिली. संगमनेर व तालुक्यातील एकूण चार शाळेने प्रत्यक्ष शाळेत येवून छात्र प्रशिक्षणार्थींची मुलाखत घेतली, व प्राथमिक स्तरावर ट्रेनी शिक्षक म्हणून निवड करण्यात आल्याची माहिती प्राचार्य डॉ. भालचंद्र भावे व प्लेसमेंट ड्राईव्हचे समन्वयक प्रा. विद्या भवर यांनी दिली.

या प्लेसमेंट ड्राईव्ह च्या माध्यमातून महाविद्यालय व परिसरातील शाळा यांच्यामध्ये शैक्षणिक दुवा निर्माण करून, छात्र शिक्षकांना शिक्षकी सेवेची संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. या उपक्रमामध्ये शिक्षणशास्त्र व अध्यापक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी मुलाखतीसाठी सहभाग घेतला. एकूण ३५ विद्यार्थ्यांनी प्राथमिक मुलखात देवून, एकूण १५ विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शिक्षक सेवेची संधी मिळणार आहे.

या प्लेसमेंट ड्राईव्हच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. भालचंद्र भावे, समन्वयक प्रा. विद्या भवर, आयक्यूएसी विभाग प्रमुख डॉ. राजु शेख यांनी प्रयत्न केले. यावेळी मोठ्या संख्येने आजी व माजी विद्यार्थी उपस्थित होते. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी, सचिव डॉ. अनिल राठी, नारायण कलंत्री, राजकुमार गांधी आदींनी अभिनंदन केले आहे.

# ठाकरेंची शिवसेना कात्रीत

## काँग्रेसच्या भूमिकेमुळे पेच वाढला



मुंबई

(युवावार्ता प्रतिनिधी)- बारामती पोटनिवडणुकीच्या अनुषंगाने राज्याच्या राजकीय वर्तुळात घडामोडींना वेग आला आहे. अशातच महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस राहुरी आणि बारामती पोटनिवडणुकीत उमेदवार देण्याच्या तयारीत असल्याने ठाकरेंच्या शिवसेनेची कोंडी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. महाविकास आघाडी म्हणून काँग्रेसच्या भूमिकेला पाठिंबा द्यायचा की बारामती पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या विनंतीचा मान ठेवत सुनेत्रा पवार यांना पाठिंबा द्यायचा, असा सवाल त्यांच्या समोर उपस्थित झाला आहे. या पार्श्वभूमीवर ठाकरेंची शिवसेना काय निर्णय घेणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

राहुरी आणि बारामती पोटनिवडणुकीमध्ये काँग्रेस उमेदवार देण्यासंदर्भात राज्यातील काँग्रेस नेत्यांनी महाविकास आघाडीतील इतर पक्षांशी फारशी चर्चा न करता भूमिका जाहीर केल्याचे दिसत आहे. त्यानंतर पक्षांतर्गत चर्चा सुरू झाल्याची माहिती आहे. दरम्यान, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी उद्धव ठाकरे यांना दूरध्वनीवरून संपर्क साधून बारामती पोटनिवडणुकीसाठी पाठिंबा देण्याची विनंती केल्याची माहिती समोर आली आहे.

या सर्व घडामोडींमध्ये काँग्रेससोबत न जाता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने बारामती पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी पाठिंबा दर्शवला आहे. त्यामुळे ठाकरेंची शिवसेना नेमकी कोणती भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पंजाबचा ऐतिहासिक पराक्रम; नवव्यांदा दोनशे पेक्षा अधिक धावांचा यशस्वी पाठलाग





चेन्नई : आयपीएलच्या सातव्या सामन्यात पंजाब किंग्जने चेन्नई सुपर किंग्जवर पाच गडी राखून दणदणीत विजय मिळवला. चेपॉक मैदानावर नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना चेन्नईने पाच गडी गमावून २० षटकांत २०८ धावा उभारल्या. संघासाठी आयुष म्हात्रेने ७३ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली, मात्र त्याला दोन वेळा जीवदानही मिळाले.

या आव्हानाचा पाठलाग करताना पंजाब किंग्जने आक्रमक फलंदाजीचे प्रदर्शन करत १८.४ षटकांत पाच गडी गमावून लक्ष्य गाठले. या विजयासह पंजाबने ट्वेंटी-२० क्रिकेटमध्ये भारताचा विश्वविक्रम मोडत २०० पेक्षा अधिक धावांचा पाठलाग करण्याचा नववा पराक्रम केला. यापूर्वी भारताच्या संघाने आठ वेळा २०० पेक्षा अधिक धावांचा पाठलाग केला होता, तर ऑस्ट्रेलियाने सात आणि मुंबई इंडियन्सने सहा वेळा ही कामगिरी केली आहे.

या सामन्यात पंजाब किंग्जने आपल्या इतिहासातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा रनचेस नोंदवला. संघाने २१० धावांचे लक्ष्य अवघ्या १८.४ षटकांत पूर्ण केले. यापूर्वी २०२४ मध्ये ईडन गार्डन्सवर कोलकाता नाइट रायडर्सविरुद्ध पंजाबने २६२ धावांचा विक्रमी पाठलाग केला होता.

दरम्यान, चेन्नई सुपर किंग्जनेही या सामन्यात एक महत्त्वाचा विक्रम आपल्या नावावर केला. आयपीएल स्पर्धेत सर्वाधिक वेळा २०० पेक्षा अधिक धावा करणारा संघ म्हणून चेन्नई अव्वल ठरला आहे. संघाने आतापर्यंत ३६ वेळा २०० धावांचा टप्पा पार केला असून, रॉयल चॅलेंजर्स बंगळूर ३५ वेळा या स्कोअरपर्यंत पोहोचला आहे.

# धार्मिकतेच्या आडोशाखालील महिला शोषण

## एक दाहक वास्तव आणि परिवर्तनाची वाट

मानवी संस्कृतीमध्ये धर्म आणि धार्मिक स्थळांना अत्यंत उच्च आणि पवित्र स्थान आहे. ही स्थळे केवळ प्रार्थनास्थळे नसून, ती मानवी जीवनाचे नैतिक अधिष्ठान, मनाची शांती आणि आधाराची महत्त्वाची केंद्रे मानली जातात. संकटाच्या काळात, जेव्हा सर्व मानवी मार्ग थकतात, तेव्हा माणूस मोठ्या आशेने आणि श्रद्धेने ईश्वराच्या दारी जातो. मात्र, अलीकडच्या काळात 'भोंदू खरात' सारख्या विकृत प्रवृत्तींनी धार्मिकतेच्या आणि अंधश्रद्धेच्या नावाखाली महिलांचे जे शोषण केले, त्यातून समाजाचे एक अत्यंत विद्रूप आणि भयावह रूप समोर आले आहे. ज्या ठिकाणी पावित्र्याची आणि सुरक्षेची खात्री असते, तिथेच जेव्हा भक्षण होते, तेव्हा तो केवळ कायदेशीर गुन्हा राहत नाही, तर तो संपूर्ण मानवी विश्वासाचा सर्वात मोठा घात ठरतो.

हे वास्तव केवळ एका व्यक्तीपुरते मर्यादित नसून, महिला आणि वंचित समाजाचे सर्वाधिक शोषण धार्मिकतेच्या नावाखाली होते, हे अनेक जागतिक अहवालांतून वारंवार स्पष्ट झाले आहे. याला आज कोणताही धर्म पूर्णतः अपवाद राहिला नाही. मग ते हरियाणामधील डेरा सच्चा सौदाचा राम रहीम असो, आसाराम बापू असो, किंवा केरळमधील ननवरील लैंगिक अत्याचाराचे प्रकरण असो; या सर्व घटनांमधून हेच अधोरेखित होते की, धर्माच्या नावाखाली सत्तेची आणि दहशतीची एक समांतर व्यवस्था उभी केली जाते, जिथे कायद्याचे भय उरत नाही.

मुळात जगाची वाटचाल चालू राहण्यासाठी उत्पत्ती महत्त्वाची आहे आणि या उत्पत्तीचा पाया नैसर्गिक लैंगिकता आहे. मात्र, अनेक धार्मिक संस्थांमध्ये ही नैसर्गिक लैंगिकता कृत्रिमरीत्या दाबण्याचा प्रयत्न होतो, ज्यातून कालांतराने गंभीर विकृती उफाळून येते आणि त्याचे पर्यावसान महिलांच्या शोषणात होते. या शोषणामागे 'सत्तेचे विषम वाटप' हे एक मुख्य कारण आहे. ऐतिहासिक काळापासून धार्मिक संस्थांच्या सर्वोच्च पदांवर आणि निर्णय प्रक्रियेत पुरुषांचेच वर्चस्व राहिले आहे. या प्रबळ पुरुषप्रधान व्यवस्थेमुळे धर्माचे नियम आणि परंपरांचा अर्थ आपल्या सोयीनुसार लावण्याचा अधिकार एकाच वर्गाकडे राहिला, ज्यातून महिलांच्या 'दुय्यम' स्थानावर सामाजिक शिक्कामोर्तब झाले.

हे शोषण थांबवण्यासाठी आता केवळ हळहळ व्यक्त करून चालणार नाही, तर त्यासाठी व्यापक स्तरावर ठोस बदल घडवून आणणे ही काळाची गरज आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे धार्मिक संस्थांच्या व्यवस्थापन समित्यांमध्ये महिलांना ५० टक्के प्रतिनिधित्व मिळणे अनिवार्य व्हायला पीडित महिलेची ओळख गोपनीय राहील अशी यंत्रणा उभी राहिली पाहिजे. जेव्हा एखादी महिला अशा शोषणाविरुद्ध आवाज उठवते, तेव्हा समाजाने तिला संशयाने न पाहता भक्कम पाठिंबा दिला पाहिजे. गुन्हेगाराला त्याच्या 'धार्मिक वेशा'मुळे किंवा पदा मुळे कोणतीही



AI IMAGE ONLY FOR ILLUSTRATION PURPOSE

शोषणाचे दुसरे महत्त्वाचे पैलू म्हणजे श्रद्धेचे अंधश्रद्धेत होणारे रूपांतर. अनेकदा महिलांना 'पाप-पुण्य', 'शाप' किंवा 'ईश्वरी कोप' यांची भीती घालून त्यांचे मानसिक खच्चीकरण केले जाते. जेव्हा एखादी स्त्री मानसिक, आर्थिक किंवा कौटुंबिक संकटात असते, तेव्हा ती अधिक हळवी झालेली असते. नेमक्या याच हतबलतेचा गैरफायदा काही स्वयंघोषित 'बुवा-महाराज' घेतात. 'अध्यात्मिक प्रगती' किंवा 'संकट निवारण' या गोंडस नावाखाली महिलांचे शारीरिक आणि आर्थिक शोषण केले जाते. याला 'पवित्रतेचे मौन' देखील तितकेच जबाबदार आहे; कारण धार्मिक स्थळी घडलेला गुन्हा उघड केल्यास धर्माची किंवा स्वतःच्या कुटुंबाची बदनामी होईल, या भीतीने पीडित महिलांना गप्प केले जाते, ज्यामुळे गुन्हेगारांचे धाडस अधिक वाढते.

हवे. जेव्हा निर्णय प्रक्रियेत महिलांचा सक्रिय सहभाग असेल, तेव्हाच तिथली सुरक्षा व्यवस्था आणि तक्रार निवारण यंत्रणा अधिक संवेदनशील व पारदर्शक बनू शकेल. त्याचप्रमाणे, समाजात वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार करणे अत्यंत आवश्यक आहे. भक्ती म्हणजे बुद्धीचा त्याग नव्हे, ही शिकवण प्रत्येक स्तरावर पोहोचली पाहिजे. धर्माचा मूळ गाभा नीतिमत्ता आणि माणुसकी आहे, केवळ कर्मकांड नाही, हे समजून घेऊन महिलांनी कोणत्याही व्यक्तीला दैवत मानण्यापूर्वी आपल्या विवेकबुद्धीचा वापर केला पाहिजे.

कायदेशीर आघाडीवरही प्रत्येक मोठ्या धार्मिक स्थळावर 'विशाखा मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे' अंतर्गत तक्रार समिती असणे बंधनकारक असावे. संपूर्ण परिसरात सीसीटीव्ही यंत्रणा आणि स्वतंत्र महिला सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करून, सवलत न देता, त्याला केवळ एक 'अपराधी' म्हणूनच वागणूक मिळायला हवी.

धर्माचा खरा उद्देश माणसाला 'माणूस' म्हणून सन्मानाने जगण्याची प्रेरणा देणे हाच आहे. जो विचार किंवा जी व्यवस्था महिलांचा सन्मान राखू शकत नाही, ती व्यवस्था खऱ्या अर्थाने धार्मिक असूच शकत नाही. श्रद्धेच्या आडोशाने चालणारी ही विकृती मुळापासून उपटून टाकण्यासाठी कायदे, शिक्षण आणि सामाजिक जागृती या तिन्ही स्तरांवर एकत्रित लढा देणे आवश्यक आहे. जेव्हा आपला समाज खऱ्या अर्थाने सजग होईल, तेव्हाच ही पवित्र ठिकाणे महिलांसाठी सुरक्षित आणि आश्वासक होतील.

**अशोक शेटे, संगमनेर**
**प्राथमिक शिक्षक**
**मो.न. ९९२११६९२८६**

# संपादकीय...

## इराण युद्धातून अमेरिकेच्या मर्यादा उघड

पश्चिम आशियात पेटलेल्या इराण संघर्षाने केवळ एक नवे युद्धक्षेत्र उघडले नाही, तर महासत्ता म्हणून अमेरिकेच्या क्षमतेची आणि मर्यादांची नव्याने परीक्षा सुरू केली आहे. आजही अमेरिकेकडे प्रचंड लष्करी ताकद, औद्योगिक भक्कमपणा आणि विस्तृत सहयोगी जाळे आहे; मात्र या संघर्षाने एक मूलभूत सत्य अधोरेखित केले आहे-'सामर्थ्य असणे' आणि 'कृतीचे स्वातंत्र्य असणे' या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. वॉशिंग्टनला आता अनेक युद्धक्षेत्रे, प्राधान्यक्रम आणि दिलेली आश्वासने यामध्ये संतुलन राखण्याची कठीण कसरत करावी लागत आहे. या तणावाची बीजे भूतकाळात खोलवर रुजलेली आहेत. १९५३ मध्ये अमेरिकेच्या हस्तक्षेपातून इराणमध्ये शाहची सत्ता पुन्हा प्रस्थापित झाली आणि त्यानंतर अनेक वर्षे दोन्ही देशांत सहकार्य राहिले. मात्र १९७९ च्या इस्लामिक क्रांतीनंतर समीकरण पूर्णपणे बदलले. बंधक संकटामुळे तणाव अधिक तीव्र झाला. त्यानंतर अमेरिकेने कधी दडपशाही, कधी रोखून धरणे, तर कधी चर्चेचा मार्ग अवलंबला; परंतु तेहरानसोबत स्थिर आणि दीर्घकालीन संबंध प्रस्थापित करण्यात तिला यश आले नाही. २०१५ चा अणुकरार हा या संघर्षातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला होता. या करारामुळे इराणच्या अणुकार्यक्रमावर मर्यादा आल्या होत्या. मात्र २०१८ मध्ये अमेरिकेने या करारातून बाहेर पडत कमाल दडपण धोरण स्वीकारले आणि त्यानंतर परिस्थिती पुन्हा बिघडू लागली. इराणने युरेनियम समृद्धी वाढवली, प्रादेशिक तणाव तीव्र झाला आणि अखेरीस २०२६ पर्यंत अमेरिका व इस्रायलने इराणविरोधात मोठ्या प्रमाणावर मोहीम सुरू केली. त्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने खाडीतील अमेरिकन तळांवर हल्ले केले आणि होर्मूझ सामुद्रधुनीत अडथळे निर्माण केले. या घटनांनी युद्ध हे केवळ शक्तीचे प्रदर्शन नसून तिच्या मर्यादांचे दर्शन घडवणारे साधन असल्याचे स्पष्ट केले. या संघर्षाने अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणातही आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. आता अमेरिका अधिक थेट, खर्चिक आणि राजकीयदृष्ट्या बांधील भूमिकेत आहे. तिची विश्वासार्हता केवळ इराणला रोखण्यात नसून अणुजोखीम, ऊर्जा पुरवठा, सहयोगी संबंध आणि संपूर्ण प्रादेशिक स्थैर्यावर प्रभाव टाकण्यात आहे. यामुळे सहयोगी देशांमध्येही नव्या प्रकारची अस्वस्थता निर्माण झाली आहे. अमेरिकेचे सहयोगी जाळे आजही मजबूत आहे; परंतु इराण संघर्षाने हे स्पष्ट केले की सर्व सहयोगी देश एकसारखा दृष्टिकोन ठेवत नाहीत. युरोपमध्ये आधीच अणुकरारावर मतभेद होते. सहयोग टिकवण्यासाठी केवळ लष्करी ताकद पुरेशी नसते; त्यासाठी स्पष्ट धोरण, संवाद आणि स्थिरता आवश्यक असते. सहयोगी देश धोका सहन करू शकतात, पण अनिश्चितता त्यांना अस्वस्थ करते. इस्रायल या संदर्भात अपवाद ठरतो. अमेरिकेच्या २०२६ च्या संरक्षण धोरणात इस्रायलला आदर्श सहयोगी मानण्यात आले आहे. पश्चिम आशियातील इतर देश मात्र अधिक गुंतागुंतीच्या स्थितीत आहेत. सौदी अरेबिया, यूएई यांसारखे देश अमेरिकेच्या सुरक्षा छत्राखाली राहतात; परंतु अमेरिका-इराण संघर्ष तीव्र झाला की तेच देश लक्ष्य बनतात. त्यामुळे अमेरिकेची ताकद त्यांना संरक्षण देते, पण त्याचवेळी धोका वाढवते. या संघर्षाचा परिणाम आशियातील सहयोगींवरही झाला आहे. अमेरिकेने आपली लष्करी साधने इराणकडे वळवली असता चीनच्या प्रभावाखालील प्रदेशांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली. त्यामुळे हा संघर्ष केवळ मध्यपूर्वेपुरता मर्यादित न राहता अमेरिकेच्या जागतिक विश्वासार्हतेची कसोटी ठरू लागला आहे. २०२६ च्या संरक्षण धोरणात देशांतर्गत संरक्षण, चीनला रोखणे, सहयोगींचा सहभाग आणि औद्योगिक क्षमता यांना प्राधान्य देण्यात आले आहे, तर युरोपने रशियाचा सामना अधिक स्वयंपूर्णपणे करावा, असे संकेत दिले आहेत. यातून महासत्ता या संकल्पनेचे स्वरूप बदलताना दिसते. महासत्ता म्हणजे केवळ युद्ध जिंकण्याची क्षमता नव्हे, तर एकाच वेळी अनेक आघाड्यांवर प्रभाव टिकवण्याची ताकद होय. अमेरिका अजूनही शक्तिशाली आहे; परंतु सर्वत्र एकाच वेळी प्रभाव राखणे अधिक कठीण होत चालले आहे. हे कमकुवतपणाचे चिन्ह नसले तरी बदलत्या जागतिक वास्तवाचे द्योतक आहे. अमेरिकेच्या अंतर्गत राजकारणावरही या संघर्षाचा परिणाम झाला आहे. अमेरिका फर्स्ट गटातील काही घटकांनी जमिनीवरील युद्ध टाळण्याचा इशारा दिला आहे. त्यांना भीती आहे की संघर्ष नियंत्रणाबाहेर जाऊ शकतो. त्यामुळे अमेरिकेने जागतिक व्यवस्थापक म्हणून भूमिका सुरू ठेवावी का, की मर्यादित राष्ट्रीय हितांवर लक्ष केंद्रित करावे, हा प्रश्न अधिक तीव्र झाला आहे.

# सप्तशृंगी देवी मंदिरात महाप्रसादाचा कार्यक्रम उत्साहात



**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–** शहरातील अकोले बायपास रोडवरील सप्तशृंगी देवी मंदिर परिसरात आयोजित करण्यात आलेला महाप्रसादाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाला संगमनेर शहरासह आसपासच्या भागातील राहणाऱ्या भाविक भक्तांनी उपस्थिती लावली होती.

सकाळपासूनच मंदिर परिसरात भक्तांची गर्दी दिसून येत होती. भाविकांनी देवी सप्तशृंगीचे दर्शन घेण्यासाठी रांगा लावल्या होत्या. आई राजा उदो उदच्या जयघोषात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. मंदिरात धार्मिक विधी, पूजन आणि आरतीचे आयोजन करण्यात आले होते.

यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. सर्व भक्तांनी शिस्तबद्ध पद्धतीने प्रसादाचा लाभ घेतला. स्वयंसेवकांनी उत्कृष्ट नियोजन करून भाविकांची सेवा केली, त्यामुळे कार्यक्रम सुरळीत पार पडला. या प्रसंगी आयोजकांनी सांगितले की, अशा धार्मिक कार्यक्रमांमुळे समाजात एकोप्याची भावना वाढीस लागते. भाविकांनीही समाधान व्यक्त करत अशा उपक्रमांचे स्वागत केले.

# व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून ग्रामीण विद्यार्थ्यांना महानगरांच्या तोडीची संधी - डी.वाय.एस.पी. कुणाल सोनवणे

संगमनेर (युवावार्ता प्रतीनिधी)-

संगमनेर येथील 'व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूट'च्या पाचव्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात उप विभागीय पोलीस अधिकारी, संगमनेर विभाग, कुणाल सोनवणे यांनी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहून विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांसमोर एक अत्यंत प्रेरणादायी, अनुभवसिद्ध आणि मार्गदर्शक भाषण केले. अध्यक्षस्थानी विद्या विद्यापीठ शिक्षण संस्था चे अध्यक्ष नामदेवराव गुंजाळ हे होते. तर कुणाल सोनवणे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. श्री सोणवने यांच्या बोलण्यातून व्यक्त झालेला वैयक्तिक संघर्ष, शिक्षणातील गुणवत्तेची जाणीव आणि स्थानिक स्तरावर उपलब्ध होत असलेल्या संधींचे महत्त्व यामुळे उपस्थित सर्वांच्या मनावर ठसा उमटला.

श्री. सोनवणे म्हणाले, आय.आय.टी. म्हटले की मला आजही माझ्या कॉलेजच्या दिवसांची आठवण येते. मी खेड्यातून आलो होतो. त्याकाळी सी.बी.एस.ई. आणि आय.सी.एस.ई. बोर्ड यातील फरक मला कळत नव्हता. मुंबईतील मुले मात्र आठवीपासूनच फाउंडेशन सुरू करत होती. जेव्हा निकाल लागला, तेव्हा कळले की फाउंडेशन किती महत्त्वाचे आणि आवश्यक आहे. योग्य वेळी मिळालेले मार्गदर्शन हे खरोखरच जीवनाला नवी दिशा देते.



आज संगमनेरसारख्या तालुक्याच्या ठिकाणी 'व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूट'ने ही एनईईटी/जेईई बरोबरच फाउंडेशनची संधी उपलब्ध करून दिली आहे, ही अत्यंत महत्त्वाची आणि अभिनंदनीय बाब आहे.

व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूट च्या यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना म्हटले की, संगमनेरसारख्या शहरात जेईई परीक्षेत देशपातळीवरची रँक मिळवणे हे सहजासहजी घडणारे नाही. येथील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर आपली छाप पाडली आहे. हे यश 'व्हिजन कोचिंग इन्स्टिटट्यूट'च्या अथक प्रयत्नांचे आणि विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे फलित आहे.शेवटी श्री. कुणाल सोनवणे साहेब यांनी विद्यार्थ्यांना आणि पालकांना आवाहन केले, व्हिजन कोचिंग इन्स्टिस्ट्यूटने उपलब्ध करून दिलेल्या या संधीचा पूर्ण फायदा घ्या. फक्त परीक्षा देऊन थांबू नका, तर त्यातून मिळणाऱ्या अनुभवातून शिका, स्वतःला सतत सुधारत राहा आणि राष्ट्रीय पातळीवर यश मिळवा. संगमनेर आता केवळ एक तालुका शहर राहिले नाही, तर गुणवत्तेचे आणि यशाचे केंद्र बनत आहे. व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूट चे मॅनेजिंग डायरेक्टर डॉक्टर हर्षवर्धन गुंजाळ यांचे आभार व्यक्त करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

सोनावणे साहेबांच्या या प्रेरणादायी भाषणाने कार्यक्रमाला एक नवा आयाम प्राप्त झाला. उपस्थित विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर नव्या उमेदीचे आणि आत्मविश्वासाचे भाव स्पष्ट दिसत होते. 'व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूट'ने केलेल्या या सामाजिक योगदानामुळे संगमनेर तालुक्यातील शेकडो विद्यार्थ्यांच्या भवितव्याला निश्चितच नवी दिशा मिळणार आहे. अविनाश सुर्यवंशी सर स्किल सेंटर व व्हिजन कोचिंग इन्स्टिट्यूट च्या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचां सन्मान प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला.

# राष्ट्रवादीत अंतर्गत संघर्ष तीव्र

## अजित पवार गटातील आमदारांचा शरद पवारांकडे कल?

**मुंबई (वार्ताहर)**–राज्यातील राजकारणात पुन्हा एकदा मोठ्या हालचाली घडण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसमधील वाढत्या अंतर्गत संघर्षाच्या पार्श्वभूमीवर अजित पवार यांच्या गटात अस्वस्थता वाढत असल्याची चर्चा आहे. या परिस्थितीत काही आमदार शरद पवार यांच्या संपर्कात असल्याचे बोलले जात असून, यामुळे सुनेत्रा पवार यांना राजकीय धक्का बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

पक्षातील संघर्ष दिवसेंदिवस तीव्र होत असून अजित पवार गटातील अनेक आमदारांमध्ये भविष्यातील राजकीय वाटचालीबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर काही आमदारांनी थेट शरद पवार यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न सुरू केल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे राज्यातील राजकीय घडामोडींना वेग येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

दरम्यान, अजित पवार गटातील एका विद्यमान मंत्र्याने गुप्तपणे शरद पवार यांची भेट घेतल्याचेही समजते. या भेटीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या संभाव्य एकत्रीकरणाबाबत चर्चा झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. पक्षातील वाढती अस्थिरता आणि अंतर्गत वाद लक्षात घेता काही नेते पुन्हा एकत्र येण्याच्या पर्यायावर विचार करत असल्याचे संकेत मिळत आहेत.

पक्षातील सततच्या संघर्षाचा परिणाम आमदारांच्या मतदारसंघांवर होत असल्याची चिंता देखील व्यक्त केली जात आहे. कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून मतदारांमध्येही नाराजी वाढत असल्याचे चित्र आहे. आगामी निवडणुकांमध्ये याचा फटका बसण्याची भीती व्यक्त केली जात असून, काही आमदार शरद पवार गटाकडे झुकण्याच्या तयारीत असल्याची चर्चा रंगली आहे.

सध्या दोन्ही गटांमध्ये सलोखा होण्याची शक्यता कमी असली तरी अंतर्गत असंतोष उघडपणे समोर येत आहे. या सर्व घडामोडींमुळे राज्यातील राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल होण्याची शक्यता निर्माण झाली असून, येत्या काळात अजित पवार गटातील आमदारांचा अंतिम निर्णय काय होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.


**जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी**

**पाहिजेत**
शिलाई मशीन कामासाठी महिला - ०२
सेल्स एक्झिक्युटिव्ह - ०१
अमोल होम डेकोर मालदाड रोड, संगमनेर
8788483245
8698001007

**पाहिजेत**
अकाउंटंट - ०१ जागा (बी.कॉम/ एम.कॉम) टॅली प्राईम
मायक्रोबायोलॉजी - ०१
हेल्पर (मुले/मुली)- ०३
२ ते ३ वर्ष अनुभव
रास्पबेरी अ‍ॅग्रो बिझनेस प्रा.लि., गोडगे इंडस्ट्रीअल इस्टेट, संगमनेर एम.आय.डी.सी च्या बाजूला,वेल्हाळे रोड
9860284257
raspberryagrosales@gmail.com

**वॉचमन पाहिजे**
बांधकाम साईट वर वॉचमन भरणे आहे
राहण्याची सोय आहे
संपर्क – नविन नगर रोड, संगमनेर
8378956909
8459199913

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

**पाहिजेत**
सेल्समन - १ जागा
सर्विस प्रोव्हायडर हेल्पर ०१ जागा
अकाउंटंट - ०१ जागा
कामाचे ठिकाण : संगमनेर
M/s. Pawar and Sons
7498621873

**हेल्पर पाहिजे**
साईकृपा एंटरप्राईजेस
पिकअप/छोटा हत्ती (लोकल वाहतुक) गाडी ड्रायव्हर बरोबर कामासाठी हेल्पर पाहिजे
पत्ता– मालपाणी मल्टिप्लेक्स समोर, संगमनेर
9767059977

**पाहिजेत**
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

**बंगला भाड्याने पाहिजे**
2500 स्क्वेअर फूट बांधकाम व 4 व्हिलर गाडी पार्किंग सुविधा, बागेसाठी जागा असलेला नवीन नगर रोड, विद्यानगर, जाणता राजा मैदान, मालपाणी हॉस्पिटल परिसरात बंगला भाडे तत्त्वावर त्वरीत पाहिजे
- संपर्क -
9503626111
9272165050

दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शकत नाही, याची नोंद घ्यावी



READ E- NEWS ON Yuvavarta.in
VISIT INSTAGRAM daily_yuvavarta

**पाहिजेत**
संगमनेर शहरात ऑफिस कामाकरिता पदवीधर मुलगा पाहिजे
आकर्षक पगार
9881855547

**भाड्याने देणे आहे**
सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो-हाऊस भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818

**त्वरित पाहिजेत**
द्वारकादास शामकुमार
सेल्समन | कॅशियर | स्टोअर मॅनेजर | फ्लोअर मॅनेजर | हेल्पर | सिक्युरीटी
कामाची सोयीस्कर वेळ १० ते ७ | १२ ते ९
9511238422

**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५





**पाहिजेत**
अकाऊंटंट | जागा ०२
टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे
आकर्षक पगार व इतर सुविधा
बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com
वाटचाल तीन दशकांची





GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005








MALPANI
卐 अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर 卐
**मालपाणी उद्योग समूह** आयोजित
**भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!**
रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण – मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर
- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था

सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा
नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक
विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!
संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर
श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)

# कै. बबुबाई शंकर पानसरे यांना भावपूर्ण श्रद्धांजली



॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥

## आमच्या लाडक्या "जीजी"

जीवनात काही व्यक्ती अशा असतात की ती फक्त आपल्या कुटुंबाचा भाग नसतात तर ती आपल्या अस्तित्वाचा पाया असतात. आमच्या घरात अशीच एक भक्कम, प्रेमळ आणि कणखर व्यक्ती म्हणजे आमची लाडकी जीजी कै. बबुबाई शंकर पानसरे. वयाच्या १०२ व्या वर्षी तिने या जगाचा निरोप घेतला, पण तिच्या आठवणी, तिचे संस्कार आणि शिकवण आमच्या प्रत्येक श्वासात कायम जिवंत राहील. जीजीचं आयुष्य म्हणजे एक जिवंत इतिहास आहे. तिने दोन नव्हे तर अनेक पिढ्या आपल्या डोळ्यांसमोर वाढताना पाहिल्या. काळाच्या प्रत्येक वळणावर तिने घराला दिशा दिली, संकटांमध्ये धीर दिला आणि आनंदाच्या क्षणी सगळ्यांना एकत्र बांधून ठेवले. तिच्या जाण्याने आमच्या घरात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. जी कधीही भरून निघणार नाही.

लहानपणापासूनच जीजीनी अत्यंत कष्टमय जीवन जगलं. त्या काळात ना सुविधा होत्या, ना आरामाचे साधन. तरीही तिनी कधी तक्रार केली नाही. घरातील जबाबदाऱ्या, मुलांचे संगोपन, नातवंडांचे प्रेम-हे सगळं तिने अत्यंत समतोलपणे आणि प्रेमाने निभावलं. अनेक दुःख, अडचणी आणि संकटं तिच्या आयुष्यात आले, पण ती कधीच खचली नाही. उलट प्रत्येक वेळी ती अधिक मजबूत बनली आणि संपूर्ण कुटुंबाला आधार देत राहिली.



माझ्या आजीला आम्ही सगळे जीजी या नावानेच हाक मारायचो. या नावातच इतकी आपुलकी आणि प्रेम दडलेलं होतं की, तिच्याशी असलेलं नातं शब्दांत सांगणं कठीण आहे. घरातील प्रत्येक व्यक्तीवर तिचं सारखंच प्रेम होतं, घरातल्या प्रत्येक नातवंडाला तीन जीवापाड प्रेम केलं पण तिचा विशेष जिव्हाळा माझ्यावर आणि दादावर होता. तिच्या डोळ्यांत आम्हा दोघांसाठी नेहमीच एक वेगळं ममत्व दिसायचं.

माझ्या लहानपणीच्या अनेक आठवणी आजही डोळ्यांसमोर ताज्या आहेत. शाळेतून घरी आल्यावर तिच्या हातचं जेवण, तिच्या गोष्टी, तिच्या कुशीत बसून घेतलेली ऊब-हे सगळं आजही मनाला स्पर्शून जातं. तिने आम्हाला केवळ प्रेम दिलं नाही, तर जीवनाचे मौल्यवान धडेही दिले. प्रामाणिकपणा, कष्ट, संयम आणि माणुसकी-हे मूल्य आम्हाला तिनेच शिकवले.

जीजीचे चार मुलगे-एकनाथ शंकर पानसरे, लक्ष्मण शंकर पानसरे, संपत शंकर पानसरे आणि भास्कर शंकर पानसरे यांनी तिच्या संस्कारातूनच आयुष्यात प्रगती केली. घुलेवाडी गावाचे माजी सरपंच भास्कर पानसरे हे तिच्या कष्ट आणि शिकवणीचेच फळ आहे. जीजींनी आपल्या मुलांना केवळ वाढवलं नाही, तर त्यांना समाजात एक सन्माननीय स्थान मिळवून दिलं.



नातवंडांमध्ये दादा म्हणजे विवेक पानसरे (श्री बलदेव कंट्रक्शनचे संचालक), मी डॉ. प्रवीणकुमार पानसरे (धन्वंतरी मल्टी स्पेशालिस्ट हॉस्पिटल), तसेच इतर सर्व नातवंडांवर तिने अपार प्रेम केलं. दादा आणि माझ्यावर त्यांचा विशेष जीव होता. आम्ही काहीही केलं तरी तीनेहमी आमच्या पाठीशी उभी राहायची. आमच्या यशात तिला सर्वात जास्त आनंद व्हायचा आणि आमच्या दुःखात ती सर्वात आधी धावून यायची.

घरातील सुना माझी आई सौ. सुशीला एकनाथ पानसरे, व माझ्या चुलत्या सौ. शकुंतला संपत पानसरे आणि सौ. पुष्पा भास्कर पानसरे यांच्यावरही तिने आपल्या मुलींप्रमाणेच प्रेम केलं. कधीही सासू-सुनेचं अंतर तिने जाणवू दिलं नाही. तिच्या वागणुकीत इतकी माया होती की, घरातील प्रत्येक जण तिच्याशी मनमोकळेपणाने बोलायचा. घरात शांतता आणि प्रेम टिकवून ठेवण्याचं मोठं श्रेय जीजीलाच जातं.

जीजीचं आयुष्य म्हणजे संघर्ष आणि समाधान यांचा सुंदर संगम होता. तिने कधीही मोठ्या अपेक्षा ठेवल्या नाहीत, पण जे काही होतं त्यात समाधान मानलं. तिच हसणं, तिच साध राहण आणि तिचा सकारात्मक दृष्टिकोन आम्हाला नेहमी प्रेरणा देत राहील.

ती दोन पिढ्यांची साक्षीदार होती. तिने जुन्या काळातील संस्कृती, परंपरा जपल्या आणि नव्या पिढीला त्याचं महत्त्व पटवून दिलं. तिच्यामुळेच आमच्या घरात संस्कारांची परंपरा आजही जिवंत आहे.



तिने दिलेल्या शिकवणीमुळेच आम्ही आज समाजात आपलं स्थान निर्माण करू शकलो.

जीजीनी अनेक दुःखं सहन केली, पण कधीच हार मानली नाही. घरात एखादं संकट आलं की, ती खंबीरपणे उभी राहायची. तिच्या धीरामुळेच घरातील प्रत्येकजण संकटांना सामोरं जायला शिकला. तिने आम्हाला शिकवलं की, आयुष्यात कितीही अडचणी आल्या तरी हार मानायची नाही.

तिच्या जाण्याने आमच्या आयुष्यातील एक मोठा आधार हरपला आहे. आज घरात तीचा आवाज नाही, तिचे हसणं नाही, पण तिच्या आठवणी प्रत्येक कोपऱ्यात जिवंत आहेत. प्रत्येक सण, प्रत्येक आनंदाचा क्षण आता तिच्या आठवणींनी भरून जातो.

जीजी, तु आम्हाला खूप काही दिलं. तुझ प्रेम, तुझे संस्कार आणि तुझी शिकवण आम्ही आयुष्यभर जपून ठेवू. तू आमच्यासोबत नसशील, पण तुझी आठवण नेहमी आमच्या हृदयात राहील.

तुझ आयुष्य आमच्यासाठी एक आदर्श आहे. तु दाखवलेला मार्ग आम्ही कायम अनुसरण्याचा प्रयत्न करू. तुझ्या आशीर्वादामुळेच आम्ही पुढे जाऊ आणि तुझ नाव उज्ज्वल करू.

**शेवटी इतकंच म्हणावंसं वाटतं-**
**क्षणोक्षणी आमच्या मनी राहील तुझीच आठवण**
**हीच आमच्या जीवनातील अनमोल अशी साठवण!**
भावपूर्ण श्रद्धांजली

**-डॉ. प्रवीणकुमार एकनाथ पानसरे (नातू)**

# आयुष्यभर कष्ट, शेवटपर्यंत माया, जीजींचे प्रेरणादायी जीवन



आदरणीय तीर्थरूप जीजी, तुम्ही आम्हाला फक्त शरीराने सोडून गेल्या आहेत परंतु तुमच्या अनेक आठवणी आमच्या सोबत आहेत. अशाच काही आठवणीना उजाळा देऊन तुम्हाला भावपूर्ण श्रद्धांजली वाहते....

कै. शंकर ठकाजी पानसरे आणि बबुबाई ही घुलेवाडी पंचक्रोशीतील नागरिकांसाठी प्रेरणादायी जोडी. दोघांचेही लहानपण घुलेवाडी गावात गेले. दोघेही शेतकरी कुटुंबातले असल्यामुळे शेती, माती आणि नाती जुळवण्यासाठी आयुष्यभर प्रयत्न केलेत. विवाह पश्चात घुलेवाडी गावातच आपला संसार फुलला. सर्वश्री एकनाथराव, लक्ष्मणराव, संपतराव, भास्करराव अशी कर्तबगार मुले जन्माला आली. परिस्थिती बेताची होती तरीही आहे त्या परिस्थितीत आपण पराजय न मानता कष्टाची पराकाष्ठा केली. आणि परिस्थितीलाही झुकायला भाग पाडले. कष्टाविना कोणतंही फळ मिळत नाही या गोष्टीवर आपला विश्वास होता त्यामुळे सातत्याने शेतामध्ये राबवून आपल्या मुलांची शिक्षणं, लग्नकार्य, सोयऱ्यांचा पाहुणचार, गावकऱ्यांचा सन्मान, गावातील सामान्य नागरिकांना सहकार्य, अशा गोष्टी आपण सातत्याने केल्यात. आपली सारी मुले कर्तबगार असल्यामुळे त्यांनी परिस्थिती झपाट्याने बदलवून एक मोठा विक्रम स्थापित केला.

आपल्या सुसंस्कारामुळे मुलानं बरोबरच नातूही अतिशय कर्तबगार निघाले. त्यांनी आपापल्या क्षेत्रात मोठी कामगिरी करून दाखवलेली आहे. त्यांना मोठे होण्यात आपल्या संस्कारांचा सिंहाचा वाटा आहे हे कोणीही नाकारू शकत नाही. अध्यात्म, वारी, वारकरी, हरिपाठ या सगळ्या गोष्टींशी आपली सातत्याने जवळीक राहिली. त्यामुळे एकंदरीत कुटुंबामध्ये सुख, शांतता, प्रेम, माया, सदाचार या गुणांची रुजवणूक निसर्गतः आपण करीत गेलात. वीस वर्षांपूर्वी जेव्हा मी या घरात सून म्हणून आले त्यावेळी जीजीने माझे नाव शांता ठेवले. गेली वीस वर्ष त्या माला शांता या नावानेच आवाज देत परंतु मागील सहा महिन्यांपासून त्या मला अनेक नावांनी संबोधित जसे आई, मम्मे. त्यांच्याजवळ मी गेले की आनंदाने म्हणायच्या आला ग माझा बोका.

वयाची शंभरी पार होताना आपण सर्व मुले नातू, पणतू, नातेवाईक, आप्तेष्ट, सगेसोयरे या सर्वांच्या प्रिय मैत्रीण आहात याचे कौतुक आहे. आणि कदाचित हाच आपल्या तंदुरुस्तीचा गुप्त मंत्र असेल असे वाटते. आपल्या या संपर्कातून गावाचा विकास होण्यात नक्कीच हातभार लागला हे कबूल करावे लागेल.

आपल्यावर कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचे अमाप असे प्रेम आहे, माहेर आहे राऊतांचे, सासरी आल्या पानसरेंच्या घरी. संसार करता करता कळलच नाही कधी आली त्यांची शंभरी. शंभरी पार करता करता कुटुंबात खूप मोठ मोठी दुःख समोर आली. अनेक मोठे आजारपण ऑपरेशन करूनही चेहरा त्यांचा नेहमीच असे हसरा. कसरत करता करता फिरे गाव भरी असे कष्ट करूनच मुलांना, नातवंडांना दिले उच्च शिक्षण. कुणाला इंजिनिअरिंग, कुणाला डॉक्टर तर कुणाला नोकरी.

**आपली नात सुन,**
**डॉ. दिपाली प्रवीणकुमार पानसरे**





## शंभरी पार मायेची माऊली

**वयाने जरी वर्ष केली पार शंभरी,**
**आदबीने चौकशी करता चार पिढ्यांची सारी।**
**घराबाहेर पडताना डोकं ठेवता तुमच्या पायावर,**
**मुलीप्रमाणेच दोन गोड पापे गालावर,**
**अन् मायेचा हात डोक्यावर...**
**खरं सांगू, यातून मिळतं देवपूजेचं समाधान,**
**जीजी, आमच्या आयुष्यासाठी**
**झालात चंदनाची सहान...**
**थकून-भागून आल्यावर म्हणता, थकलीस बाई,**
**दोन घास खाऊन घे.**
**जातो थकवा, येते आईची आठवण,**
**शब्द जाणवतात तिचेच ते...**
**वय जरी शंभरी पार...**
**कॅमेरे फिरतात ३६० अंश गरागरा,**
**दिवसभरात आलं कोण, गेलं कोण-**
**मिळतात आम्हाला जीजींच्या खबरा...**
**तुमचं वय किती, घरात किती मदत-**
**याला महत्त्व फारसं नाही,**
**तुमचे कष्ट, प्रेम, पालकत्व, ममत्व**
**आम्ही विसरूच शकत नाही।**
**कधी खचलो, कधी थकलो तर डोक्यावर**
**हात ठेवून लढ म्हणा,**
**आलेच डोळ्यात कधी अश्रू**
**तर स्मरणात ठेवते तुमचा स्वाभिमानी बाणा...**
**जीजी, तुमच्या चार शब्दांनी**
**मिळते मनाला उभारी...**
**देवा, प्रार्थना करते तुम्हाला-**
**द्या अशी माऊली प्रत्येक घरोघरी...**
**द्या अशी माऊली प्रत्येक घरोघरी...**

आपली नात सुन,
डॉ. दिपाली प्रवीणकुमार पानसरे

रविवार **०५** एप्रिल २०२६

वर्ष १९ वे
अंक - ८३
पान - ०६
किंमत - ०४ रूपये

दैनिक **युवावार्ता**
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

संपादिका : सौ. सुशीला किसन हासे (बी. ए.)
संस्थापक : किसन भाऊ हासे (बी. जे.)
कार्यकारी संपादक : सुदीप किसन हासे (एम.ई.)

- Web : www.yuvavarta.in/com
- Mail : dailyyuvavarta@gmail.com
- RNI No. MAHMAR/2007/24252
- पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

# कै. बबुबाई शंकर पानसरे यांना साश्रूनयनांनी भावपूर्ण श्रध्दांजली !

## सर्वांची प्रेमळ जिजी, आम्हा भावंडांची आजी





**जसं पाण्याशिवाय नदी नाही,**
**झाडांशिवाय जंगल नाही,**
**दाहकतेशिवाय अग्नि नाही,**
**शीतलतेशिवाय सावली नाही,**
**आणि सुगंधाशिवाय चंदन नाही.**

तसंच जीजीशिवाय आमच्या कुटुंबाला छत्र नाही.

माझी आजी फक्त माझी एकट्याचीच नाही तर आमच्या सर्व कुटुंबाची मायेची ऊब देणारी उन्हात गारवा देणारी सावलीच. आमची जीजी म्हणजे एक बहु आयामी व्यक्तिमत्व जीवनाच्या अनेक चढउतारांवर अनेक वाऱ्या वादळांना भक्कमपणे तोंड देणारा एका भक्कम किल्ल्याचा भक्कम बुरुज ....

पुंजा बाबा राऊत यांच्या घरात दोन नंबरच्या कन्येचे स्थानावर जीजी होती. शंकर ठकाजी पानसरे यांच्या जीवनात यश, कीर्ती आणि सौभाग्य घेऊन जीजी घरात आली.

एका विडी कामगाराची बायको अत्यंत गरिबीची परिस्थिती अशी तिच्या जीवनाची सुरुवात. शेतामध्ये बांधलेलं छोटंस कोप्ट म्हणजे तिचा सौभाग्य महालच. माझे आजोबा शंकर बाबा अत्यंत कर्मठ व प्रपंचिक व्यक्तिमत्व. त्यांच्याबरोबर संसार करताना जीवनात अनेक अडचणींचा सामना तिला करावा लागला. तिच्या बोलण्यातून नेहमी जाणवायचं परंतु त्या तक्रारीमध्ये सुद्धा नवऱ्याबद्दल प्रेम क्षणोक्षणी पाहिलेल आहे. जिजीला माझे वडील धरून चार आपत्य, जिजी स्वतः अडाणी असली तरी तिने तिच्या चारही मुलांना शिकवण्याचा अत्यंत कसोशीने प्रयत्न केला. वेळप्रसंगी पोटाला चिमटा काढून मुलांना शिकवण्यासाठी तिने अतोनात प्रयत्न केले. जुन्या काळात नाला बंडिंगच्या कामावर प्रसंगी खोदकामही केले. ती नेहमी मला सांगायची मी बराशीचे काम केले आहे. त्याच्यातून तिने मुलांना घडवले, शिकवले, मोठे केले. अशाच कष्टातून तिने बाराशे रुपयावर एक बिघा जमीन घेतली. हे आम्हाला नेहमी सांगायची. आश्चर्य म्हणजे एक आडानी बाई लिहिता वाचता येत नाही तरी ती जमिनीचा अत्यंत व्यवहारी हिशोब करून जमीन खरेदी करते. कसं बरं तिला जमलं असेल याचे आम्हाला आजही खूप आश्चर्य वाटतं. तिचे सर्व जुने कागदपत्र तीने अत्यंत जपून ठेवलेले आम्ही पाहिलेले आहे. जशी संसारामध्ये जीजी साजग होती, तशीच परमार्थामध्येही मोठी दाणी व मोकळ्या हाताची होती. माझे वडील म्हणजे तिच्यासाठी एक गर्वाच स्थान होतं. चारी लेकरांवर तीने सारखीच माया केली. जीजी अत्यंत धार्मिक प्रवृत्तीची पांडुरंग हरी, राम कृष्ण हरी तिच्या मुखात अखंड जप चालू राहायचा. अत्यंत गरिबीच्या परिस्थितीतही तिने दारावरून कोणी वारकरी चालला तर दोन घास त्याला भरवल्याशिवाय ती पुढे जाऊन द्यायची नाही. मी लहानपणापासून पाहत आलो की कोणी साधुसंत चालला तरी ती मला हाक मारून बोलवायला लावायची. त्याला दोन घास खाल्ल्याशिवाय घरापासून पुढे जाऊन द्यायची नाही. तिने अनेक वेळा पंढरीची वारी केली. वेळप्रसंगी शंकर बाबांना वारीसाठी जाण्यास पदर मोडही केली. या सर्व गोष्टी लहानपणापासून मी पाहत आलेलो आहे. तिने चारही मुलं अशा काही एकोप्याने उभे केले की आजही त्यांच्या बंधुप्रेमाचं कौतुक गावभर केलं जातं. माझ्या वडिलांनी सर्व भावंडांना जीवापाड सांभाळल. त्यांच्यात कधीही भेद केला नाही. याचे सर्व श्रेय माझ्या आजीला जातं तिने दिलेले संस्कार निश्चितच अत्यंत उच्च प्रतीचे होते. कदाचित ते संस्कार माझ्यात आणि प्रवीणमध्ये व माझ्या सर्व भावंडांमध्ये रुजलेले आहेत. जीजीने नेहमी सर्व नातवंडांना शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहित केलेले आहे. ती नेहमी सांगायची शिक्षण घेतलं तर मोठे व्हशाल, साहेब व्हशाल आणि सुखात जीवन जगशाल. चारी मुलांना जसं तिने एकोप्याने राहायला शिकवलं तसच सर्व सुनांना सुद्धा एकोप्यानेच नांदायला शिकवलं. शेवटपर्यंत सर्व सूना तिच्या शब्दाच्या बाहेर गेल्या नाही.

माझी आई व सर्व चुलत्या यांच्यात मला कधीही वाद झालेला पाहायला भेटला नाही. आमच्या गावामध्ये दामबाबा या नावाने प्रसिद्ध असलेले संताने छोट कवलारू राम मंदिर घुलेवाडी माळावर बांधल होत. ते राम मंदिर कालांतराने मोडकळीस आले. जीजीने ते राम मंदिर वर्गणी काढून नवीन राम मंदिराची पायाभरणी केली. कारखान्यावर अनेक अधिकारी लोकांकडे दान धर्माची झोळी घेऊन वर्गणी गोळा केली. कारखान्याचे सिव्हिल इंजिनियर श्री काकडे साहेब यांच्याकडून तिने मदत मिळवली. त्या वेळचे कारखान्याचे कॉन्ट्रॅक्टर सांडूभाईन तिने सिमेंटची मदत मिळवली. सिकंदर यांच्याकडून वाळू, विटा मिळवल्या. कोणतीही जात धर्म न पाहता बघता बघता राम मंदिर उभ राहिल. प्रभू रामचंद्रावर तिची नीस्सिम श्रद्धा. मला आणि भैय्याला लहानपणापासून प्रभू रामचंद्राला आंघोळ घालायला लावणे, गावठाणातील सकाळीच प्रत्येक देवाला पाणी घालायला लावणे. या प्रकारचे संस्कार आम्हा भावंडांवर तिने केले. आमच्या पिढीमध्ये भैय्या म्हणजे माझा छोटा भाऊ पहिल्यापासून अभ्यासात एक नंबर. त्याच्यावर तिची विशेष माया. त्याचं नामकरण नंदू म्हणून तिनेच केलं. माझा नंदू मोठा होईल, फॉरेनला जाईल, खूप मोठा माणूस होईल, लहानपणापासून ती बाळकडूच पाजत होती. कदाचित त्यामुळेच त्याच्यात आणि आम्हा भावंडांमध्ये मोठे होण्याच्या जिद्दीच बाळकडूच पेरलं गेलं. त्याचबरोबर मला ती नेहमी धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभाग घ्यायला लावायची. घरात अन्नधान्याची तुटही असेल तरीही मला आठवतं असं एकही वर्ष नाही, ज्या वर्षी दारापुढे कोणती दिंडी जेवण करून गेली नाही. गावात सप्ताह बसवायचा त्याच्यासाठी तिचं विशेष लक्ष असायचं. त्या सप्त्यामध्ये शिधा देण्यासाठी ती नेहमी अग्रेसर असायची. अंबाबाईचे मंदिर असो मारुतीरायाचं मंदिर असो किंवा वारकरी शिक्षण संस्थेचे मंदिर असो, तीने त्यात स्वतः पदर मोड घालून काम पूर्ण करण्यास मोठा हातभार लावलेला आहे. कारखान्यावर गुरु मंडळामध्ये कमलामाईला तिने गुरु म्हणून स्वीकारले. आणि शेवटपर्यंत गुरुमाऊलीने जी शिकवण दिली तिचे तीन अखंड पालन केले. लहानपणापासून पाहत आलो ती जेवताना कधीच बोलली नाही. प्रत्येक घासायला कृष्ण कृष्ण कृष्ण बोलायची आणि घास गिळायची. ती जेवायला बसली की आम्ही नातवंडांनी समजून घ्यायचंकी ती जेवण संपल्याशिवाय बोलणार नाही. आपल्याला फक्त ऐकू येणार ते म्हणजे कृष्ण नाम. तिने अशी मोठी तपश्चर्या जीवनभर केली. तिनं जीवनात एकही चातुर्मास मोडलेला नाही. अत्यंत दक्षतीने तिने सत्तर चातुर्मास पूर्ण केलेले आहे. तिची खांडगावच्या महादेवावर अखंड श्रद्धा होती. मी तिला गमतीने एकदा म्हणालो होतो, अग तू इकडे कृष्ण कृष्ण म्हणते आणि इकडे महादेवाचे पाया पडते कृष्णाला राग येणार नाही का? मी चौथी पाचवीलाच असेल तेव्हा तिने मला हा साक्षातकार दिला, की हरीहारा नाही भेद, रामकृष्ण शिव एकची असे. कोणतही अध्यात्मिक शिक्षण नसताना इतकी भगवंताबद्दल आत्मबोध, निषीम श्रद्धा खरोखरच कौतुकाचा आणि संशोधनाचा विषय आहे. कसं काय या माऊलीला भगवंता प्रति आढळश्रद्धा प्राप्त झाली याबद्दल मला नेहमीच अप्रूफ वाटत राहिलेले आहे. मी जसा मोठा होत गेलो तसा मला व भय्याला तिच्या भक्तीचा परिस्पर्श झाला. भैय्या पुण्याला मेडिकलच्या शिक्षणासाठी गेला. तिथे त्याला कृष्ण भावनामृत संघामध्ये श्रील प्रभूपादांच्या कृष्ण भक्तीचे ज्ञान प्राप्त झाले. त्याने संगमनेरला आल्यानंतर मला कृष्णभक्ती काय आहे हे समजावले. तो माझा छोटा भाऊ असून माझ्यासाठी खरोखर गुरु झाला. जिजीला त्याचं खूप कौतुक त्याच्या तोंडावरून हात फिरवायची आणि त्याच्या कृष्णा प्रति असलेल्या भक्तीच कौतुक करायाची.

जिजीच्या जीवनामध्ये पुत्र वियोगाचे दुःख प्राप्त झाले, पतीवियोगाचे दुःखद झाले, अत्यंत मोठ्या धीराने दोन्ही संकटावर तिने मात केली. सर्व कुटुंबाला तिने धीर दिला. पांडुरंगाची इच्छा म्हणून तिने ते दुःख सुद्धा स्वीकारले. कठीण परीक्षांचा तिने सहजतिने सामना केला. ज्या वेळेस तिने सर्व पोरांचे संसार, नातवंडांचे संसार आणि परतोंड सुद्धा पाहिले. तेव्हा चेहऱ्यावर अत्यंत सात्विक समाधान व भगवंता प्रति ऋण व्यक्त करण्याची तिची प्रवृत्ती दिवसं दिवस वाढत होती. घरात अनेक वेळा आजारपण अपघात अशा प्रकारची संकट आली. त्या संकटांमध्ये कदाचित भगवंताने तिच्या भक्तीची कसोटीच घेतली. घरामध्ये तिच्या पुण्याईवर अनेक संकटे दूर झाली. माझ्या आजारपणामध्ये मी स्वतः हा अनुभव घेतलेला आहे. साधुसंत घरी आले तर तिचा आनंद गगनात मावत नसे. आम्हा सर्व भावंडांना तीने सांगितलं की आपल्या दारात भक्तांची, साधुसंतांची उष्टावळ पडलीच पाहिजे. तीच पुण्याई तुम्हाला कामाला येईल. दिन दुबळ्यांना मदत करत जा. कुणालाही त्रास होईल असे वागू नका. कोणाला लुबाडू नका. नेहमी चांगले कर्म करा. आळस करू नका. यश आलं तर उतू नका, मातू नका. अपयश आलं तर खचून जाऊ नका, असे एकनाअनेक संस्कार आमच्यावरती रुजवले. तिच नेहमी एकच म्हणणार होत, भगवंताने सगळं काही दिलं फक्त अंतकाळी त्याचं नाव माझ्या मुखात आलं पाहिजे. माझी मती त्याच्या चरणावरून कधीच ढळली नाही पाहिजे. या प्रकारची प्रार्थना घरी आलेल्या प्रत्येक साधूसंताला तिने केली. इस्कॉनचे कोणतेही ब्रह्मचारी आले तर नेहमी तिची एकच मागणी शरीरातून आत्मा जाताना देवाचं नाव माझ्या मुखात आल पाहिजे. मला असाच आशीर्वाद द्या. तिची योग्यता समजण्यापलीकडची होती. डॉक्टरने आणि मी तिच्या शंभरीचा गौरव सोहळ्याचा कार्यक्रम साजरा केला. अन तो प्रसंग डोळ्यापुढे उभा राहत आहे, पुढे पालखी चालली आहे, पालखीमध्ये जीजी बसलेली आहे. ती आकाशाकडे हात वर करून टाळ्या वाजवत पांडुरंग पांडुरंग पांडुरंग म्हणते आहे. खाली आम्ही सर्व तिचे परतोंड, नातवंड, मुलं दिंडीप्रमाणे तिला स्टेजवर घेऊन आलो. आम्ही सर्वांनी अत्यंत भावनिक प्रसंग अनुभवला. तालुक्याचे आमदार बाळासाहेब थोरातांवर तिची विशेष प्रीती. नेहमी बाळासाहेब थोरात यांचे कौतुक करणार. जीजीच वक्तृत्व निश्चितच कौतुक करण्यासारखं होतं. बाळासाहेब थोरात यांच्या प्रचारामध्ये सुद्धा ती हिरहिरीने भाग घ्यायची. दुर्गाताई तांबे बरोबर कॉर्नर सभा असतील, गावात रॅली असेल तर ती नेहमी सहभाग नोंदवायची. बाळासाहेब थोरात यांना तिचं खूप कौतुक, निळवंड्याचं पाणी जेव्हा पाटाला आलं तेव्हा जीजीने डोळ्यात पाणी आणून बाळासाहेबांचं केलेले कौतुक आजही आठवतं. जीजी आपल्यात नाही परंतु तीन महिन्यापूर्वी तिचे बोललेले वाक्य मात्र कानात गुंज घालतात. दादा रामनवमीला मंदिराला निशान लाव. रामनवमी झाल्यानंतर मी जाणार आहे. खरोखर जीजी ने रामनवमी नंतरच इहलोकाची यात्रा पूर्ण केली आणि ती वैकुंठाला गेली. खरोखर आमच्या जीवनातला मोठा आधार संपला. परंतु तिने दिलेली शिकवण जीवन जगण्यास सुसह्य करणारी आहे. तिला खरोखर आत्मबोध झालेला होता. तिचा आत्मा निश्चितच भगवंताच्या चरणी स्थिर झालेला आहे. आणि ती पुण्याई आम्हाला सुद्धा भगवंता प्रती स्थिरचित्त व भक्ती देणारी असेल. जीजी आम्ही सर्व खूप भाग्यवान आहोत. तुझ्यासारखी आजी आम्हाला मिळाली. आमच्या कैक जन्माची पुण्याई तुझ्या रूपाने फळाला आली . आमच्या कुटुंबाचा ऊर्जा स्रोत रामनवमीच्या पावन पर्वावर भगवत भेटीला निघून गेला. परंतु एक खात्री आहे तिच्यामुळे भगवंताचे कृपाशीर्वाद आमच्यावर स्थाई रूपाने वर्षावत राहतील. माझ्या कृपासिंधू आजीला भावपूर्ण श्रद्धांजली.

हरे कृष्णा..................

**– विवेक एकनाथ पानसरे (नातू)**



क्षणोक्षणी आमच्या मनी...राहील तुमचीच आठवण...
हीच आमच्या जीवनातील...अनमोल अशी साठवण...!



**कै. बबूबाई शंकर पानसरे**
यांना
**॥ भावपुर्ण श्रध्दांजली ॥**

**- दशक्रिया विधी -**
रविवार दि. ०५/०४/२०२६ रोजी सकाळी ९.०० वा.
ठिकाण - घुलेवाडी येथील मंगल कार्यालयमध्ये होईल

**- शोकाकुल -**

| | |
|---|---|
| एकनाथ शंकर पानसरे (मुलगा) | संपत शंकर पानसरे (मुलगा) |
| भास्कर शंकर पानसरे (मुलगा) | शरद लक्ष्मण पानसरे (नातु) |
| रामनाथ सहादु पानसरे (पुतण्या) | महादु सहादु पानसरे (पुतण्या) |
| बाळासाहेब सहादु पानसरे (पुतण्या) | अशोक सहादु पानसरे (पुतण्या) |
| रतनबाई रामनाथ राऊत (पुतणी) | सिंधुबाई चांगदेव बेंद्रे (पुतणी) |
| विवेक एकनाथ पानसरे (नातू) | अनुष्का अजित पानसरे (नात) |
| डॉ. प्रवीण एकनाथ पानसरे (नातू) | दत्तात्रय संपत पानसरे (नातू) |
| किरण संपत पानसरे (नातू) | प्रतीक भास्कर पानसरे (नातू) |

**समस्त पानसरे परिवार व आप्तेष्ट**



**भाषाप्रभू ह. भ. प. जगन्नाथ महाराज पाटील**
संस्थापक संत नामदेव महाराज किर्तन विद्यालय, शहापूर



कौटुंबिक छायाचित्रे